
# क्षण

आकाश खांडके







# क्षण

आकाश खांडके

ई साहित्य प्रतिष्ठान

क्षण

लेखक : नाव - आकाश उमेश खांडके.

पत्ता - "कृष्णा" आर 6

अयोध्या पार्क, कावळानाका, कोल्हापूर 416003

फोन - 9552959699

ई मेल - akashkhandke1@gmail. com

मुखपृष्ठ - आशिष बागणे

प्रज्वल चौगुले

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : २४ सप्टेंबर २०१७

©esahity Pratishthan®2017

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

"क्षण" हा एक लेख संग्रह आहे.

प्रत्येक लेख हा काही क्षणांचा 'खेळ' आहे. खेळ म्हणतोय कारण ते आपण स्वतः आपल्या आयुष्यात खेळलेले आहेत.



प्रत्येक लेख वाचताना तुम्हाला कुठेतरी तो स्वतःचा वाटेल तुमच्या भावनांशी जोडला जाईल. पुस्तक वाचायला कुठूनही सुरवात करा, कुठे ही थांबा.

थोडक्यात हे पुस्तक तुमच्या मनाचा, भावनांचा आरसा आहे. वाचता वाचता स्वतःच्या अनुभवांच प्रतिबिंब बघा त्यात.

ती पहिली मुलगी जिला तुम्ही डोळयांनी नाहीतर मनाने बघितलेलं, तुमच्या आई बरोबरच तुमचं गोड नात, या पासून एखाद्या दुःखाच्या आठवणी पर्यंत सगळं आहे या पुस्तकात.

आयुष्यातला थोडा वेळ काढून या क्षणांचा आनंद लुटा.

तुमच्या सुखद क्षणांना आठवा......

- आकाश खांडके

# अनुक्रम

शोध
खिडकी
समुद्र
प्रवास
जाणीव
आठवण
अंधार
ती
अस्तित्व
क्षण
मोह
भेट
निरागसता
नजरा नजर
औषध
सत्य
आई
काळकोठडी
पाऊस
कबुली

( या लेखांतील सर्व पात्रे, स्थळे, प्रसंग व नावे काल्पनिक असून, याचा प्रत्यक्ष काही संबंध नाही.
यदा कदाचित तसा काही संबंध आल्यास तो निव्वळ योगायोग समजावे. )

# शोध

दुपारच्या मस्त झोपेनंतर जरा अभ्यास करायची इच्छा झाली.

वेळ म्हणण्यापेक्षा इच्छा बोललो कारण ती कधीतरीच होती.

तोंड धुवून, काय अभ्यास करावा?? या विचारात असतानाच एकदम आठवलं कि वर्कशॉपचं जर्नल पूर्ण करायचं काम अर्ध्यातच राहिलय. काल योगा योगाने ते सर पण भेटलेले आणि मी मोठ्या ऐटीत ' सर सोमवारी दाखवतो जर्नल ' असं सांगून टाकलेलं.

त्यामुळे सध्या ते एक काम होतं माझ्याकडे करायला. मनाचा निर्धार तर झालेला आता वेळ होती कष्टाची. हे कष्ट म्हणजे जर्नल शोधणे. माझा मोबाईल आणि इयर फोन सोडले तर कुठलीही गोष्ट कधीच जागेवर नसते. अगदी चष्मासुद्धा रात्री कुठं ठेवलाय हे ही आठवायचं सकाळी एक एक्स्ट्रा काम असतंच माझ्या डोक्यावर.... या गर्वाने सांगायच्या गोष्टी नाहीत. हे मलाही माहित आहे. पण आता सांगतोयच तर सगळं सांगणं मला बंधनकारक आहे. माणसाच्या सवईं वरून त्याचा स्वभाव कळतो असं म्हणतात. असो मी विषयावरून भरकटतोय.

परत मुद्द्यावर येऊ.

मी जागेवरून उठलो आणि नेहमी जिथं पुस्तक ठेवतो तिथे जर्नल शोधायला लागलो. दरवेळेस प्रमाणे पहिल्या बघण्यात मला ते दिसलं नाही. पण मला त्याचं काहीच वाटलं नाही. हे माझ्या बरोबर तसं रोजच होतं. मी परत शोधलं. पण दुसऱ्या वेळेस मात्र मी जरा घाबरलो. इथे नाही तर खाली असेल या आशेत खालच्या सगळ्या रूममध्ये शोधलं. जर्नल सापडतच नव्हतं. ह्याच्या पुढची आणि बहुदा शेवटची पायरी म्हणून मी माझ्या काकीला विचारलं. सहसा असं कधीच होत नाही की तिला माझ्या वस्तू कुठे आहेत हे माहित नाही. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे तिला सुद्धा माहित नव्हतं.

आता मात्र मी खरंच घाबरलो. सगळं घर परत एकदा शोधलं.

घराच्या ज्या कानाकोपऱ्यात जर्नल शोधायची गरज नाही तिथे सुद्धा शोधलं. कॉलेजमधल्या एका दोघांना सुद्धा फोन करून बघीतलं. पण उपयोग काहीच झाला नाही. आता पर्यंत मनाचे खेळ चालू झालेले. डोक्याने आपले विचार मांडायला सुद्धा सुरुवात केलेली.

जर्नल सापडलच नाही तर? ? ?

तस माझ गणित खूप कच्च आहे. तीन मधले दोन तर मी कंडोल वर सोडवले आहेत. पण अश्या गोष्टीत ते मला छान जमत.

अकरा एक्सपेरिमेन्ट. एक नाही म्हणलं तरी नऊ ते अकरा पानांच. या हिशोबाने कमीत कमी आठवडा मोडणार बाकी अभ्यासा बरोबर. या सगळयामध्ये डोकं गरगरायला लागलं.

विचार करण शक्यच नव्हतं.

आता तुम्ही म्हणाल कि एव्हड काय त्याच्यात. लिहायचं परत.

पण ज्याने लिहिलेलं असत त्यालाच कळत. माझी अस्वस्थता बघून काकी बोलली कि "सापडेल रे.... शांत हो जरा आणी काही तरी दुसर करत बस. "तिचा मनातून खूप राग आलेला. पण तिच ते म्हणणं मला पण पटलं. तो विचार बाजूला ठेवून मी दुसऱ्या कामाला लागलो.

आणी थोड्याच वेळात मला आठवलं कि परवाच्या पार्टीत बॅग नसल्यामुळं मी ते एका दुसऱ्या कॉलेजच्या मित्राला ठेवायला दिलेलं. आणी माझ्याच आळशीपणामुळे ते आणायचं राहिलेलं. मी ते विसरलेलोच.

आता लेखक म्हणल्यावर हे असच कस सोडून चालेल. शब्दांची आणि विचारांची फोडणी नको का. म्हणझे मला काय वाटलं ते सांगतो. बरोबर, चुकीचं ठरवणारे तुम्ही. हा पूर्ण प्रसंग आपल्या आयुष्यासारखाच होता की. किती तरी गोष्टी आपण ठरवतो पण त्या आपल्या इच्छेप्रमाणे होत नाहीत. आणि कुठेतरी आपण त्यात गुंतून राहतो.

गोष्टी, प्रॉब्लेम सोडून पुढे जायला शिका. तो जर सुटणारच नसेल तर त्यात अडकून राहण्यात काय मजा आहे. माझ घर दहा वेळा शोधून सुद्धा ते जर्नल सापडणारच नव्हतं. कारण ते तिथे नव्हतच. तसच एखादी गोष्ट घडण्याची सुद्धा एक वेळ असती. त्या आधी तुम्ही वाट्टेल ते केलं तरी ते नाही होणार.

याचा अर्थ असा नाही की आशा सोडा, हिम्मत हारा आणि पुढे जावा. मुळीच नाही. हा.... फक्त त्याला थोडा वेळ द्या.

त्या जर्नलच्या विचारातून बाहेर पडायच्या प्रयत्नातच ते सापडलं. त्यामुळे प्रयत्नाबरोबर हिम्मत आणि सय्यम सुद्धा बाळगा.

प्रश्न हे सुटण्यासाठीच असतात.....

नाहीतर त्यांना प्रश्न थोडीच म्हणल असत?

# खिडकी

पाऊस कुणाला आवडत नाही.

गार वारा, विजांच कडकडन, पाण्याच्या थेंबांचं जमिनीवर पडने, अहं पडने शब्द बरा नाही वाटत थेंबांचं जमिनीला भेटताना अगदी आपल्या जवळच्या प्रेमळ व्यक्तीला भेटल्या सारखं. अशा असंख्य गोष्टी आहेत या पावसाबद्दल.

पण एक सांगू मला पाऊस नाही आवडत.

मला असं वाटतं की कुणालाच पाऊस आवडत नाही.

हा.. काही लोक आहेत जसे की लेखक. कुठंतरी स्वतःच हृदय तोडून यायचं आणि पाऊसाच्यात आणि तिच्यात साम्य शोधत कविता लिहायची. म्हणजे मी काय कविता किंवा प्रेमाच्या विरोधात वैगैरे नाही.. पाऊस आवडत नसला तरी प्रेम मला ही आवडत.

मी एव्हड गारायन पारायण सांगितलं पण हे सांगितलंच नाही की मला पाऊस का आवडत नाही.

सांगेन ते पण सांगेन गडबड कुणाला आहे. ना मी कुठे जाणार आहे ना तुम्ही. नाही ना जाणार कुठे?

पावसाळयावरून एक गोष्ट आठवली.

आमच्या घरा समोर एक आजीबाई राहतात. मी रोज त्या आजी ला बघते. झोपडी आहे त्यांची. पोरगा आणि आई एवढच त्यांचं विश्व. उन्हाळा हिवाळा कसाही निघून जातो पण पावसाळयात खूप हाल होतात त्या आजीचे.

पाऊस आला की झोपडी कशी वाचवायची. पाणी आत यायला नाही पाहिजे , या सगळया प्रयत्नात त्या आजीची सगळी तारांबळ होते. मी हे सगळं माझ्या रूमच्या खिडकीतून बघत असते...

मला वाईट वाटत पण मी काय करणार?

आधी आधी खूप वाईट वाटायचं. पण आता सवय झाली.

कधी कधी तर ही गोष्ट मी करमणूक म्हणून सुद्धा बघते.

माणसाला प्रत्येक गोष्टीतून आपल्याला काय मिळेल या एकाच विचारात रस असतो. माझं पण तसच झालय.

दुःख, दया आणि भावनांच्या पलीकडे जाऊन मी त्यात आता करमणूक शोधते. आई सकाळी कामाला जाते ते रात्रीच येते. बाबा कधी जातात आणि कधी येतात हे खूपदा आईला पण माहित नसतं मग माझी तर खूप लांबची गोष्ट आहे.

एक कामवाली मावशी असते घरात पण तिच्याकडे बघूनच नको वाटतं. ती येतानाच खिडकीतून दिसते. वैतागेली कंटाळलेली ते पण सकाळ सकाळी. काही लोकांचा जसा अकारण तिटकारा येतो तशी काही लोक अकारण आवडतात सुद्धा मनाला.

अगदी फुलांच्या मोहक सुगंधा सारखी. तो ही तसाच आहे.

झाल आता तुमच्या डोक्यात नक्की आलं असणार कि हीच काही तरी लफडं आहे किंवा जरा सभ्य भाषेत बोलायचं तर हीच कुणावर तरी प्रेम बसलंय.

काही प्रमाणात तुम्ही बरोबर आहात, पण काहीच. सगळ्या नाही. तसा तो रोज दिसत नाही. पण कधी कधी क्रिकेट खेळतो मित्राच्या बरोबर आमच्या घरा समोर. समीर नाव आहे त्याच. छान खेळतो. आम्ही कधी बोललो नाही. पण कधी कधी हसतो माझ्या कडे बघून. मी जर कवी असते ना तर नक्की त्याच्या त्या हसण्यावर कविता लिहिली असती.

आणि एक गोष्ट, कधी कधी ना तो त्या आजीला मदत पण करतो. आज काल नाही दिसत तो. कारण काय सांगू

' पाऊस '

. पण हे कारण नाही माझं पावसावरच्या रागाबद्ल. ते कारण पुढे संगेनच  मी. असं खूपदा वाटतं की त्याच्या बरोबर बोलावं पण नाही जमत. त्याला आपल्या बद्दल काय वाटेल हा एकच प्रश्न मला थांबवतो. मज्जा म्हणझे तो माझ्याच

शाळेत आहे... पण काही उपयोग नाही. मला जेवढ कळत त्या प्रमाणे तर मुलांना सुंदर मुली आवडतात. मी नाही तेवढी सुंदर.

तसं मला अभ्यासात पण जास्ती रस नाही. पण करावा लागतो. न करून सांगणार कुणाला. मला परिक्षेचे स्वप्न पडतात सारखे. मी पेपरला बसले आहे आणि मला काहीच येत नाही.

फक्त आणि फक्त हे खरोखर होऊ नये म्हणून मी अभ्यास करते. लहानपण किती छान होत ना, का ते छान होत म्हणून लहानपण होत. काय माहित?

लहानपणावरून आठवलं उन्हाळाच्या सुट्या म्हणझे नुसता खेळ असायचा. पण सगळं बदललं. खेळ पण आणि माणस पण... आता इथं बसून राहणं खिडकी समोर हा एकच खेळ...

खूप इमोशनल झालं का? ? नका विचार करू...

अरे आता परत पाऊस चालू झालाय. शेजारची मुलं भिजायला आलेत. मी पण भिजयाचे कधी कधी निधी बरोबर.

माझी मैत्रीण लहानपणची. पर्वा खूप वर्षांनी दिसली आमच्या पुढंच्या घरी आलेली. तिने नाही बघियल मला पण याच खिडकीतून मला दिसली. पण बर झालं. नाहीतर ती मला भेटायला आली असती. पण आता मी जाणार तिला भेटायला.

चला झोपते खूप वेळ झाला. मनात होत ते सगळं लिहुन काढलं. आता कोण वाचेल, कधी वाचेल काय माहित.

अरे हो सगळं सांगितलं आणि नाव राहीलच.

राहूदे. नावात काय ठेवलंय.

अजून एक गोष्ट उद्या माझ्या पायांच ऑपरेशन आहे. कदाचित मी काही दिवसात चालू लागेन. खिडकी बाहेरच विश्व बघेन.

आणि हो मला पाऊस आवडत नाही कारण मी स्वतः त्याच्यात भिजू शकत नाही.

काही दिवसांनी नक्की आवडेल.

# समुद्र

खूप दिवसांनी गोव्याला गेलेलो.

गोव्याला गेलोय आणि समुद्रात खेळलो नाही असं फार क्वचितच होत. कदाचित तुम्हाला सुद्धा हे पटेल.

असंच समुद्रकिनारी बसलेलो. मऊ वाळूवर येणाऱ्या त्या लाटा माझ्या पायांना धडकून जात होत्या. वरती मोकळं आकाश आणि समोर नजरबंदी करणारा विशाल समुद्र. तशी थोडी गर्दी होती पण त्याचा मला काहीच फरक पडत नव्हता. मी किनाऱ्यावर बसून सुद्धा त्या विशाल समुद्रात हरवलेलो.

त्या किनाऱ्यावर बसल्यावर एक गोष्ट मला जाणवली की ज्या वेगाने लाटा मला धडकून बाहेर फेकण्याचा प्रयत्न करत होत्या त्याच लाटा स्वतः परत जाताना मलासुद्धा त्यांच्याबरोबर खेचत होत्या. हे मला जाणवल्यावर माझं मन समुद्रात आणी मानवी स्वभावात साम्य शोधण्यात गुंतून गेलं. माणसाचं पण असचं असत ना? एखाद्या माणसाला आपण क्षणात जवळ करतो, त्याची जास्ती ओळख नसताना सुद्धा आणी एखाद्याला छोट्याश्या चुकीसाठी किंवा गैरसमजामुळे आपण त्या लाटांच्या सारखे आयुष्यातून बाहेर फेकून देतो.

हा असा विचार चालू असतानाच एकदम लक्षात आलं की परत जायची वेळ झालेली. सूर्याने सुद्धा लपण्यासाठी जागा शोधायला सुरुवात केलेली. बाहेर जायच्या आधी एकदा थोड आत जाऊन यावस वाटलं, त्या सुमुद्राला जवळून भेटावस वाटलं. जसं जसा मी आत जात होतो तसं मला जाणवायला लागलं की लाटांचा आकार आणि वेग वाढतच चाललेला. मी पुन्हा एकदा विचारांच्या वादळात अडकलो. मला तिथे समुद्राचे एक नवीनच रूप बघायला मिळत होत. किनाऱ्यापासून मी खूप आत नव्हतो गेलो पण किनारा नक्कीच मागे सुटलेला. लांबून बघणाऱ्याला समुद्र असा पण आहे हे कधी कळेल का?

थोडक्यात काय तर माणूस पण एक समुद्रच आहे ज्याच्या विचारांचा, प्रेमाचा अंदाज आपण त्याच्यापासून लांब राहुन नाही लावू शकत.

तिथून बाहेर आलो आणि वाळू वरून चालत माझ्या हॉटेलकडे निघालो. जाता जाता एकदा मागे वळून बघावस वाटलं.

बघितल्यावर दिसला तो आपल्या मनासारखा विशाल, सगळं सामावून घेणारा समुद्र आणि वाळूवर उमटलेली माझं अस्तित्व दर्शवणारी पावले......

# प्रवास

दुपारची वेळ... त्याच्या जोडीला रखरखते ऊन...

या अशा परिस्तिथीत मी बस स्टँडवर बसची वाट बघत उभारलेलो. उभं रहायच कारण म्हणजे बसायला जरा सुद्धा जागा नव्हती. पायांनी हळू हळू तक्रार करायला सुरुवात केलेली पण दुसरा पर्याय नव्हता.

बसची वाट बघणे हा एक नको असणारा अनुभव आहे

आणि आज तो माझ्याच वाट्याला आलेला.

खूप कालावधी नंतर एक बस आली. बसला झालेल्या वेळामुळे प्रवाश्यांची गर्दी सुद्दा वाढली होती.

बस येऊन थांबली आहे हे मला नीट कळायच्या आधी लोकांनी तिच्या दरवाज्या वर लोकल ट्रेनला असती तशी गर्दी केली सुद्धा.

बस आल्याचा आनंद आणि या बस मध्ये आपल्याला बसायला मिळणार नाही याच दुःख एकाच वेळेस मला जाणवलं.

एक वायफळ प्रयत्न म्हणून का होईना मी त्या गर्दीत माझ अस्तित्व दाखवण्यासाठी उभारलो.

' माझी जागा पकडणार का? ? ? ' मी एका हसऱ्या व्यक्तीला बोलून गेलो. पकडली तर पकडली नशिबाचा भाग

त्या वेळेस माझ्या मनाच हेच म्हणणं होत.

सगळी गर्दी संपल्यावर मी बसमध्ये चढलो. त्या वेळेस कंडक्टर लोकांना गर्दीच्या नावाखाली बस मधून उतरवत होता. आत चढलो आणि त्या व्यक्ती ने मला हात केला.

शेवटून दुसऱ्या सीटवर माझी जागा पकडून तो बसलेला. उभारलेल्या लोकांना बाजूला करत मी जागे जवळ पोहचलो. त्याला हसून धन्यवाद देत मी उभ्या लोकांकडे तुच्छ नजरेने बघत सीट वर बसलो. बसलेल्याचा सगळयात जास्त आनंद माझ्या पायांना झालेला. कानात इयर फोन घालून प्रवासाची मजा लुटण्याच्या हेतूने गाणी चालू केली. आणि तेवढ्यात ती बस मध्ये चढली. ती चढली आणि कानात वाजणाऱ्या रोमँटिक गाण्याला  खरंच अर्थ आला.

ती नाजूक, गोरीपान होती. हातातल्या बॅगचे ओझं सांभाळत असताना तिचे डोळे मात्र बसायला जागा शोधत होते. पण ते आता शक्य नव्हतं. जागा शोधत शोधत ती मागे पर्यंत आली आणि माझ्या सीटला टेकून उभारली. मी तिला बघतोय हे तिने बघितलेल पण बॅग सांभाळण्यात ती व्यस्त  होती. बस चालू झाली.

कानात गाणे वाजत होते पण त्याकडे लक्ष काही लागेना. काही तरी चुकतंय एव्हड मला कळत होत पण काय?

त्या गाण्याच्या मधेच मी एकदा तिच्याकडे बघितलं. ती फार त्रासलेली, उभारने तिला शक्यच नव्हतं.

मी तिला मघापासून बघत होतो. पण तिचा त्रास मला का दिसला नाही?

कशाचा हि न विचार करता मी जागेवरून उठलो आणि तिला बसायला सांगितलं.

मी असं का केलं?

तिला खरंच बसायची गरज होती म्हणून?

का ती दिसायला सुंदर होती म्हणून?

तिला बसवण्यात माझा काय स्वार्थ होता माहित नाही.

पण उभारल्यानंतर मला खरंच बर वाटलं.

# जाणीव

तो कावरा बावरा झालेला.

त्याला आपल्या बाजूला असंख्य चेहरे दिसत होते. पण त्यात तो कुठेच नव्हता जो तो जिवाच्या आकांताने शोधत होता. लोक त्याच्याकडे बघून आपल्या रस्त्याने चाललेले. वाईट खूप जणांना वाटत होतं पण त्याच्या दुःखात सहभागी होऊन त्याला मदत करणारं कोणीही नव्हतं. हाफ चड्डी आणि टी शर्ट घातलेला करण रडत ओरडत रस्त्याकडेला उभारलेला. आज सकाळच्याच भांडणांमध्ये तो आईला घर सोडून जाण्याची धमकी देऊन मोकळा झालेला.

वेगळ्या प्रकारे का होईना पण आजच त्याला तो अनुभव आलेला. ५ मिनिटाच्या विरहामध्येच त्याला आईची किंमत कळली. तिच्या शिवाय स्वतःच अस्तित्व जाणवलं. आई सापडावी या एकाच आशेत तो पुर्ण जत्रेमध्ये ओरडत रडत फिरत होता.

आणि शेवटी त्याला आई दिसली. आनंद काय असतो हे त्याला त्या क्षणी कळलं. जो कुठल्याही शब्दामध्ये, वाक्यामध्ये  व्यक्त करता येणार नाही असा आनंद.

अंगातली सगळी शक्ती एकवटून तो आईकडे पळाला आणि तिला मिठी मारली.

त्या आनंदात त्याला एकचं गोष्ट जाणवली.

त्याच्या पेक्षा त्याची आईच जास्त रडलेली.

# आठवण

मला तिला भेटून किमान 3 वर्ष झाली. नुसतं बघूनसुदधा 2 वर्ष झाली. शाळेमध्ये तिच्या सगळया मैत्रिणी माझ्यासुद्धा मैत्रिणी होत्या. पण तीच्याबरोबर मी तस खूप कमी बोललोय.

तिच्या मैत्रिणीबरोबर बोलायचं कारण काढून मी तिच्याकडे बघायचो हळूच तिची नजर चुकवून.

तिला माझे हे असले पराक्रम माहीत होते. पण तिने यावर कधीच आक्षेप घेतला नाही.

काल विचार करत बसल्यावर जाणवल की माझ्या एका मित्राने गमतीने तिचा फोन नंबर मला सांगितलेला. ते पण ३-४ वर्षांपूर्वी.

त्याचा तसा मला कधीच उपयोग झाला नसला तरी तो अजून माझ्या लक्षात आहे.

कदाचित यालाचं प्रेम म्हणतात...

# अंधार

भिंतीचा आधार घेऊन ती विसावलेली.

डोळे शून्यात बघत होते. तोंडावर आनंदाच्या आणि दुःखाच्या दोन्ही छटा होत्या. दुःख जरा ताज वाटत होतं पण आनंद भरपूर मुरलेला.

मनाचं आणि शरीराचं युद्ध चाललेलं. पण सगळं आतल्याआत. बाहेर त्याची झलक सुदधा नव्हती. मनात राहुलच्या सगळया चांगल्या आठवणी ताज्या होत होत्या. राहुल बरोबरच तिचं प्रेम आणि मग प्रेमविवाह, अनेक विस्मरणीय क्षण.

पण डोक्यात अंधार होता. राहुलने तिच्यावर केलेल्या त्याचाराचा, मारहाणीचा, दारू पिऊन दिलेल्या त्रासाचा, बाहेर केलेल्या लफडयांचा, त्याच्या बेईमाणीचा.

एका क्षणाला जाऊन तिच्या सहनशक्तीचा कडेलोट झाला आणि त्याच्या परिणाम म्हणून तीच नातं जडलं आता तिच्या समोर पडलेल्या चाकू बरोबर.

कदाचित चुकीचं असेल. पण तो चाकूच तिला तिच्या प्रश्नांची उत्तरे देईल, तिला या त्रासातून मुक्त करेल असं वाटून गेलं.

ती बसलेली. पुढे पडलेला तो रक्त बंबाळ चाकू.

आणि त्याच्या पुढे

राहुलचा मृतदेह.

# ती

आज ती दिसली. खूप खूप वर्षांनी दिसली. मी होतो म्हणूनच तिला ओळखलं. कारण तिच्यात झालेल्या बदला सकट तिला ओळखायला नुसत्या नजरेची नाही तर हृदयाची सुद्धा गरज होती.

त्या वेळच तीच ते शेम्बड नाक, विस्कटलेले केस आणि आत्ताचा तिचा मेकअप, हेअर स्टाईल. या मधल्या प्रवासात तिला खूप जण भेटले

असणार. तिच्यावर प्रेम करणारे, तिच्या देहावर प्रेम करणारे.

पण मी मात्र कायम तिच्या डोळ्यातच अडकलो. आणि त्या डोळ्यांनी मला कधी काही बोलूच दिलं नाही.

घरात येऊन आरश्यात बघितल्यावर कळलं की तिने कितीही प्रवास केला असला तरी मी तिथेच होतो.

आणि तिथेच राहणार. तिच्या डोळ्यात.

आज ती दिसली. खूप खूप वर्षांनी दिसली.

# अस्तित्व

कुठे आहे मी? कोण आहे का इथे?

कोण सांगेल का " मी कोण आहे ते मला? "

मला काहीच आठवत नाही. कोणीतरी बोला... मला सांगा... मी कोण आहे... माझा आक्रोश ऐका... मला सांगा... सांगाना...

मी तो आदीमानव तर नाही ना?

ज्याच जगणे हाच आयुष्यातला एकमेव हेतू होता. हेतू काय घेऊन बसलोय त्याला तर आयुष्य म्हणजे काय हेच माहीत नव्हतं. पण फक्त जगणे हा काय माझा हेतू नाही.

मग मी तो आदीमानव नसणार.... नाही नाही नसणारच...

मग मी रामायणातील राम असू शकतो.

पण काय मी त्याच्या एवढा एकनिष्ठ आहे? हम्म...... नाही नाही

तो आणि मी खूप भिन्न आहोत.

माझं डोकं जड होत चाललंय.

कोणीतरी माझी मदत करा.

मी इथे आलो  तरी कुठून?

मला कळलंय. मी कर्ण आहे.

त्याच्यासारखा अहंकारी सुद्धा आहे. पण मी तेवढा दानशूर नाही. अजिबात नाही.

अशोक आणि माझ्यात काही साम्य आहे?

आहे की, कदाचित मी त्याच्या एवढा क्रूर आहे. पण वेळ आल्यास त्याच्या एवढा बदल मी स्वतःच्यात कधी घडवू शकेन?

खूप अवघड आहे. कदाचित अशक्यच..

आता तर मला माझ्या अस्तित्वाचीच शंका यायला लागली आहे. अंधार वाढतच चाललाय. पण मला आता भीती वाटेना. स्वतःला शोधण्यात आनंद मिळतोय.

तसं कृष्णात आणि माझ्यात भरपूर साम्य आहे.

पण तोच पूर्ण करताधरता होता. पण इथे मीच अडकलोय. मी काय कृष्ण होणार?

मला वाटतंय.

मी त्या असंख्य गर्दीमधील एक मध्यमवर्गीय माणूस आहे.

पण तो स्वतःच्या अस्तित्वाचा एवढा विचार करेल कधी? जर करत असता तर तो त्या गर्दीपासून भिन्न कोणीतरी असता.

मी तो नाही, नक्कीच नाही...

हळू हळू मला माझा स्वभाव, सवयी, विचार कळायला लागलेत. पण पूर्ण व्यक्ती म्हणून मी कोणी आहे का?

मी इथे कसा आलो, कुठून आलो, माझा भूतकाळ काय?

मला काहीही आठवत नाही.

हा अंधार आहे तरी कसला. काळ कोठडीतला, रात्रीचा का अवकाशातला. काहीही कळत नाही.

पण आता मला ही अवस्था आवडायला लागली आहे.

भूतकाळ नसल्यामुळे चिंता नाही. वर्तमानकाळ नसल्यामुळे जवाबदारी नाही आणी भविष्यकाळाचा तर प्रश्नच नाही.

या सगळया गोष्टींमधून जर मी मुक्त असलो तर मला वाटतंय कदाचित.... कदाचित मी देव असणार.

हो.......... मी देव आहे.

मीच सगळं बनवलंय. मला कळलं. एकदाच समजलं.

मीच सर्वश्रेष्ठ आहे.

हे... हे काय होतंय मला?

मी छोटा होत चाललोय. मला काहीही समजेना. मी देव आहे मग मी स्वतःला का वाचवू शकत नाही.

मी गायब होतोय.... वाचवा.... वाचवा.... मी काय करू?

मी कुठे आहे. माझा आत्मा, माझं शरीर कुठं आहे?

वाचवा..

# क्षण

खूप कंटाळलेलो. काहीच करायला नव्हतं म्हणून नाईलाजाने दुकानात बसलेलो. गावाकडे सुट्टीला आल्यावर माझं असंच होत. दोन तीन दिवस छान वाटत पण परत घरची ओढ तिथे थांबू देत नाही. काहीही न करता नुसतं बसल्यामुळे अंगात आळस भरलेला. रस्त्यावरून जाणाऱ्या गाड्यांचा वेग हळू हळू कमी होत चाललेला. उन्हाच्या जागी सावली पसरत होती. जणू काय सूर्यसुद्धा त्या उन्हाला कंटाळलेला. रस्त्यावर चालणारी लोकसुद्धा हळू हळू कमी होत होती.

हे सगळं खरच होत होत का?

नाही नाही... ही सगळी मला आलेल्या झोपेची जादू होती आणि त्याचा परिणाम म्हणूनच नजर खाली गेलेली. झोपेची नशा हळू हळू अंगामध्ये चढत होती. मी तिचा विरोध करत नव्हतो कारण मला पण ती नशा हवीहवीशी वाटत होती. डोळ्यांनी पूर्ण पणे शरणागती पत्करली.

" हे पाटलांच दुकान आहे का? "तो आवाज कानावर नाही तर हृदयावर पडला. डोळयावर अधिराज्य गाजवलेल्या झोपेची नजरेने तमा न बाळगता सरळ

आवाजाचा वेध घेतला. आणि तिला बघून नजरेला ही कळलं की आपण जे केलं ते बरोबरच केलं. तिच्या डोळयातली नशा झोपेचीही झोप उडवणारी होती. तिचे डोळे पत्ता शोधण्याच्या गोंधळात होते. तोंडावर एक हलकीशी चिंतेची झलक होती. ती चिंतेची झलकच तीच सौंदर्य अजून खुलवत होती. मी आहे त्या जागी उभारलो. माझ्याकडे खरचं बोलायला शब्द नव्हते आणि तशी बोलायची इच्छा ही नव्हती. मी तिला डोळयात साठवण्यात व्यस्त होतो. मी एखाद्या पुतळयासारखा उभा होतो. तिला शोधत, स्वतःला हरवून. काही क्षणात तीच तीलाच कळलं की आपण चुकीच्या जागी आलोय. ती हसली. एकदम गोड हसली.

त्या नाजूक सुंदर ओठांनी ती "सॉरी" म्हणून दुकानाबाहेर पडली. तिच्या नजरेने मला जागेवरून उठवलेलं तेच तिच्या शब्दांनी परत मला खुर्चीवर बसवलं. या काही क्षणाच्या खेळात मी रसिक होतो की त्या सुंदर क्षणाचा भाग हे माझं मलाच समजलं नाही. ते काहीही असुदे, पण

ती कोण होती? कुठुन आलेली? काहीही माहीत नाही.

ती परत दिसण्याचीही शक्यता नव्हती.

पण तो क्षण मात्र तिचा होता आणि त्यात मी बुडलेलो.

# मोह

घामाने भिजलेला राहुल  बसमध्ये चढला.

बस तशी मोकळीच होती आज. खिडकी जवळच्या सीटवर तो बसला. विस्कटलेले केस आणि त्यात लाल भडक डोळे.

त्या क्षणाला राहुलला बघून कोणीही सांगितलं असत कि त्याला एव्हड भरून आलाय कि कुठल्या ही क्षणी त्याचा डोळयांचा बांध फुटू शकतो. तो मात्र जमेल तेवढ लपवण्याचा प्रयत्नात होता.

राहुल इथे एका कंपनीमध्ये सेल्समन म्हणून काम करायचा.

दिवसभर  फिरून वस्तु विकायचा. तस कष्टाचं काम.

सकाळी ९ ते रात्री ९. सुट्टी दिवस रविवारी. पण त्याला त्या सुट्टीचा काहीच ऊपयोग नव्हता.. एकट्या माणसाला कामा पेक्षा सुट्टीचाच जास्त त्रास होतो. महिन्याला ३००० मिळायचे. तसे जास्त नव्हते पण कमी सुद्धा नव्हते. गावाकडे आई राहायची.

गाव पण तस लांबच होत. आणि वेळेपेक्षा गरीब माणसाला पैशाची जास्त काळजी करावी लागती. राहुल त्याला काही अपवाद नव्हता. आईच वय झालेलं. ती पण आजारीच असायची. पण राहुल नाही जायचा तिला भेटायला.

अहं... याचा असा अर्थ अजिबात नाही की राहुल आईला विसरलेला किंवा त्याला तिची काळजीचं नव्हती. तो तिच्यासाठीच तिच्या पासून लांब होता.

पैसे कमवणारा तो एकटाच. मग आई जवळ राहणे किंवा शहरात पैसे कमवून आईच औषध पाणी

बघणे यातलं एकच काहीतरी शक्य होत त्याला.

स्वभावाने खूप गरीब होता. जास्त बोलकेपणा नसल्यामुळं मित्र नाहीत. आपल्याच जगात वावरणारा व्यक्ती.

खर सांगायचं तर त्याला नव्हतं आवडत हे काम, पण शिक्षणाचा अभाव माणसाला काही ही करायला भाग पाडतो.

१० दिवसांपूर्वी राहुलला गावाकडून पत्र आलेलं कि आई जरा जास्त आजारी आहे. पण मालक सुट्टीच देण्यास तयार नव्हता. त्याने खूप विनवण्या केल्या. पण ऊपयोग काहीच नव्हता.

" तुझ्या सारखे खूप बघितले आहेत मी. नाटक असतात ही तुमची गेलास कि नोकरी पण गेली असं समज "

या मालकाच्या धमकीमुळे राहुलची जायची हिम्मत झाली नाही. त्याने उधार पैसे घेऊन घरी पाठवले.

पण स्वतः मात्र लगेच जाऊ शकला नाही.

४ -५ दिवस तो नुसताच स्वतःला आणि नशिबाला कोसत राहिला करणार तरी काय बिचारा यापलीकडे.

कामात गुंतून राहणे एवढच तर होत त्याच्या हातात.

काल राहुलचा पगार झाला. दिवाळी आल्यामुळं थोडा बोनस पण मिळाला. या साळयातच गावाकडून शेजाऱ्यांची चिट्ठी आली की आई ठीक आहे.

४ दिवसांनी दिवाळी ची सुट्टी होतीच ३ दिवस. त्यामुळे राहुल सुद्धा जरा सुखावला. आईला नवीन साडी घेतली.

पर्वा  तो फार आनंदात झोपला. झोपताना एकदा परत पैसे मोजले त्याने. पैसे मोजायची फार हौस त्याला.

त्याच रात्री मात्र फार विलक्षण प्रकार घडला.

राहुलच्या स्वप्नात त्याची आई त्याला बोलवत होती.

" ये रे बाळामला तुला डोळे भरून बघायचं आहे.

आताच ये. नको नको ऊद्या सकाळी ये. पण दिवाळीची वाट नको बघत बसू. "

राहुल दुसऱ्या दिवशी उठला. शेजारी फोन करून आईची चौकशी केली तर ती बरी आहे पण काल पासून बाहेरच आली नाही असं कळलं त्याला. हा फोन पण नशिबानेच लागतो कधीतरी.

आज मात्र सकाळ सकाळी त्याला फोन आला की "'राहुल आई गेली. "

काही न सूचता काही विचार न करता तो सरळ बस मधून गावी निघाला. त्यातच कुणीतरी त्याच पाकीट मारलं.

घरी पोहचला तर सगळं संपलेलं.

अग्नी सुदधा देऊन झालेली.

राहिलेली ती नुसती राख.

राहुल सुन्न होऊन बसलेला. शेजारचे काका येऊन बोलून गेले आणि तो पूर्णपणे तुटला.

पैशाच्या कागदात आणि नोकरीच्या मोहात त्याने काय गमावले हे त्याला कळून चुकलं.

' बाळा आई तुझी परवाच रात्री गेली असावी. आम्हा कुणाला कळलच नाही. आज सकाळी जरा संशय आला म्हणून दरवाजा तोडून बघितलं तर हे असं झालेलं. बॉडी ठेऊनही उपयोग नव्हता. '

राहुलला कळून चुकलं कि पर्वाच स्वप्न काय आणि का होत..

आई बोलवत होती आणि आपण अजून एक दिवसाच्या पगाराच्या मोहात अडकून काय गमावून बसलो.

पाकीट पण गेलं. आणि जिच्यासाठी सगळा खटाटोप चाललेला ती आई पण.

# भेट

तसं त्या दोघांच्यात जास्ती अंतर नव्हतं पण ते बघणाऱ्यांसाठी. त्यांच्यात खरचं किती अंतर होत ते फक्त त्या दोघांनाच माहीत होतं.

तिच्या डोळयात निव्वळ अपराधीपणा होता. त्या अपराधीपणाची कारणं तिची तिलाच माहीत होती. दुःख पण असेल पण ते त्या क्षणाला दिसत तरी नव्हतं. तो मात्र शांत उभा होता. खूप शांत. सगळं संपल्यासारख, सगळं हरल्यासारखं. विरह काय असतो ते त्याच्या चेहऱ्यावर दिसत होतं.

तिचे डोळे लाल झालेले, रागाने नाहीतर अश्रूंमुळे. कोणीही काहीही बोलत नव्हतं. तरीपण खूप बोलण चाललेलं. आजूबाजूच्या गोधंळात ते दोघे कुठेतरी हरवून गेलेले.

त्याचे डोळे किंचाळत होते " एकदा हो म्हण, फक्त एकदा. बाकी सगळं मी बघतो. "

पण खूप उशीर झालेला. हे तिला कळलेलं. आणि कदाचित तो तिच्यामुळेच झालेला. तिचा एक होकार सगळं बदलू शकत होता. पण ती

वचनाच्या, परिस्तिथीच्या बंधनात जखडलेली... खूप मोठी भिंत होती त्या दोघांच्यात. दगडा मातीची नव्हे दगडांची  तर विचारांची, दुःखाची भिंत होती ती.

ती नटून, शालू नेसून लग्न मंडपाकडे निघालेली.

ही त्यांच्यात झालेली एका क्षणाची भेट, बहुदा शेवटची.

# निरागसता

" मला तीच गाडी पाहिजे. मला राहुल बरोबर खेळायचं आहे. आई जाऊदे ना मला. "

५ वर्षांचा श्रेयस आज सकाळपासून रडत होता. त्याच्या समोर असंख्य खेळणी पडलेली. असं कुठलं ही खेळणं नव्हतं जे श्रेयसच्या आई बाबांनी त्याच्यासाठी आणलं नव्हतं.

पण आज त्याच मन एका हाताने फिरवता येणाऱ्या जत्रेत मिळणाऱ्या गाडीत अडकलेलं. जी त्याच्या बंगल्याच्या वॉचमनच्या मुलाकडे होती. आई त्याला समजावत होती. त्याच्यावर ओरडत सुद्धा होती. थोडक्यात त्या गाडीचा विषय डोक्यातून काढण्यासाठी जे लागेल ते सगळं करत होती.

तेवढ्यात बाबा घरचा दरवाजा उघडून आत आले. आई लेकराचा काय गोधंळ चाललाय हे त्यांना सुदधा कळेना. त्या संधीचा पूर्णपणे उपयोग करून घेत श्रेयस घरातून सटकला.

आई रागाने लालबुंद झालेली. आई बाबा टेरेसवरून खाली बघत उभारले. जेवढा आनंद श्रेयासला राहुलला बघून झालेला. तेवढाच आनंद राहुलला सुद्धा झाला होता.

दोघे मजेत खेळायला लागले.

हे सगळं बघून आईला वाटलं की 'मी त्याला का थांबवत होते? '

कारण तो वॉचमनच्या मुलाबरोबर खेळायचा हट्ट करत होता? का त्याला ती खटारा गाडी हवी होती म्हणून? नाही.

मी त्याला स्वतःसाठी थांबवलेलं.

मुलाच्या मजेपेक्षा आनंदापेक्षा. मला माझी श्रीमंती, समाजातील स्थान जास्त प्रिय होत.

पण श्रेयसने या गोष्टींचा पलीकडे जाऊन त्या मुलाकडे, त्या गाडीकडे बघितलेलं. कदाचित यालाच निरागसता म्हणतात.

त्याला फक्त खेळण्याचा आनंद दिसत होता. आणि मला ते सोडून बाकी सगळं.

बाबा श्रेयासला परत आणायला निघालेले.

पण आईने त्यांना थांबवलं.

# नजरा नजर

रोजच्यासारखी आज सुदधा आमची नजरा नजर झाली. मी टाळायचा प्रयत्न केला. पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. ते भावशून्य डोळे, भाव नसूनही खूप काही सांगायचा प्रयत्न करत होते. ऐकायला थोडं विचित्र वाटत ना? मला त्या डोळयात बघताना वाटत.

क्षणाच्या नजरा नजरेतच माझ्या डोळयांनी शरणागती पत्करली. जमिनीचा आधार शोधत ते मानेच्या साथीने खाली झुकले. शब्द तोंडात तयार होते पण त्यांना बाहेर येण्याची वाट सापडत नव्हती. आणि येऊन करणार तरी काय? सांगा ना काय करणार?

त्यांना काही किंमत राहिलेली का? आणि जरी त्यांना किंमत असती तरी त्यांना काही आधार होता? प्रत्येक गोष्टीला आधार लागतो. अगदी माणसालासुद्धा. पण माझ्या शब्दांच काय? त्यांना कसला आधार?

त्या शब्दांचं तोंडात अडकून राहण्याला तोंड कारणीभूत नव्हतं.

कारणीभूत होता माझाच त्यांच्यावर असलेला अविश्वास, निराधार.

हाथ शर्टाच्या बटनांबरोबर चाळे करत होते. दुसरं काही करण्या जोग नव्हतंच त्यांच्याकडे. त्या चाळयातच एक बटण तुटलं. क्षणासाठी त्या बोटांनी माझं

आणि त्या बटणाने माझ्या परिस्तिथीच वर्णन केलं. जे फक्त मला कळत होतं. फक्त मला.

मला तिच्याबरोबर बोलायचं होत. पण मला सगळं आधीच माहीत होतं. मला तिची..... नाही तिच्या प्रश्नांची भीती वाटत होती. प्रश्न म्हणलं की ऊत्तर आलच. पण नाही, इथे अस नव्हतं. इथे मी अशी परिक्षा देत होतो ज्यातले प्रश्न मला आधीच कळलेले. पण दुर्दैवाने मी ऊत्तर नाही शोधु शकलो.

मागचे कितीतरी दिवस मी त्या प्रश्नांच्या अंधारात एका कोपऱ्यात पाय पोटाला लावून बसलोय. पण हे असं किती दिवस चालणार? कधी सकाळ होणार? का इथे सकाळ पण अशी काळोखातच होती? हा काळोख मी संपवणार. उत्तर शोधणार.

नजर मिळवणार, पण आत्ता नाही. मी जातोय. चप्पल कुठे आहे माझी?

मी जातोय. हाताचेआणि बटनाचे नाते तोडत. प्रश्नाचा अंधार संपवत. मान परत एकदा ताठ करण्याच्या हेतूने.

तिच्या डोळयात डोळे घालून बघायच्या हिमतीच्या शोधात.

काय वाट्टेल ते करेन. पण एक गोष्ट नक्की.

आज घरात माझी बायको आणि मुलं उपाशी झोपणार नाहीत.

# औषध

लायब्ररीमध्ये मी तिच्या बाजूला उभा होतो.

तस माझं तिथे काहीच काम नव्हतं. पण ती लाईनमध्ये उभी होती म्हणून मी तिथे थांबलेलो. घरी जायची घाई आणि तिच्या बाजूला उभारण्याची ओढ यामध्ये मी कुठेतरी अडकलेलो. तशी ती खूप लाजरी आहे. कदाचित तिला हे कळलेलं की मी लायब्ररीमध्ये का थांबलोय? तिने माझ्याकडे लक्षच दिल नाही.

उभारल्या उभारल्या विचारांनी डोक्यात आपलं घर करायला सुरुवात केली.

जी मुलगी वॉट्सएपवर आपल्याला उत्तर देत नाही. ती समोर आल्यावर बोलेल?

मला तिच्या नावाने चिडवताना तिने खूपदा ऐकलेलं. त्यातला मित्रांच्या चेष्टेचा भाग सोडला तर बदनामी तर तिचीच होत होती ना?

काही कारणास्तव तिचा वर्ग पण बदलला होता. त्यामुळे तिचा वर्गमित्र म्हणून घ्यायचा हक्क पण मी गमवलेला.

लाईन हळू हळू पुढे सरकत होती. मी ही सरकत होतो पण माझ्या नाहीतर तिच्या वेगाने. जी मुलगी मला आवडते तिच्याबरोबर बोलायची माझी हिम्मतच होत नाही. तिला लायब्ररीत येताना बघून मी गोधंळात पडलेलो.

आपराध्या सारखा कोपऱ्यात उभारलेलो. मी तिला बघितलंय हे तिने सुदधा बघितलेलं ना.

मग मीच का बोलायचं? ती पण बोलू शकते? हे असे विचार डोक्यात डोकावण्याचे कारण म्हणजे माझा अहंकार.....

जो माझ्यात भरपूर आहे. पण तिच्यासारखी दुसरी पण कोणी नाही ना?

या विचारांच्या संपण्याबरोबर लाईन पण संपत आली. २ मिनिटांसाठी सगळे विचार बाजूला ठेऊन मी तिला 'हाय' म्हणलो.

त्या हायचा परिणाम म्हणूनच तिचा गोड आवाज आणि हसरा चेहरा खूप खूप दिवसांनी बघायला मिळाला. आपलं काम सोडून काही क्षण ती माझ्याबरोबर बोलली, हसली.

बस की. मला पण या पलीकडे काहीच नको होतं.

पण माझं येणाऱ्या काही दिवसांचं औषध होत ते.....

# सत्य

तो भर सकाळी उठतो किंवा उठवला जातो. स्वप्नांच्या राज्यांतून त्याला खेचून वर्तमानात आणलं जातं. ते विश्व त्याच स्वतःच असतं, त्याचेच विचार. पण उठल्यावर मात्र त्याच असं काहीच राहत नाही. इथे त्याला पाहिजे ते होण्यासाठी, करण्यासाठी नुसते विचार असून चालत नाहीत तर पैसे आणि कष्ट सुद्धा लागतात. मज्जेची गोष्ट म्हणजे हे दोन्ही असून पण त्याला पाहिजे ते मिळेल का नाही याची काहीही शक्यता नसते. तो आवरून, झोपेला अंगातून झटकून अश्या शर्यतीत पळायला चालू करतो ज्यात त्याला पळायचं आहे का नाही हे कदाचित त्याला सुद्धा माहीत नसतं. इथे पुढे जायला दुसऱ्यांना चिरडावच लागतं. पळणाऱ्या दुसऱ्या व्यक्ती बरोबर मैत्री होऊ शकते, कधी कधी प्रेम पण होऊ शकते, पण या भावना किती वेळ टिकतील आणि त्याला पुढे जायची संधी मिळाल्यावर तो ते टिकवतो का? हा मोठा प्रश्न असतो. इथे थांबायला कुणालाही वेळ नाही. जो थांबला तो मागे राहिला. कोणीही त्याच्यासाठी थांबत नाही. तो परत ऊठून पूर्ण आत्मविश्वासाने पळायला लागला तर ही शर्यत जिंकू पण शकतो. पण जर तो कुणाची वाट पाहत बसला की कोणी येईल, त्याला उठवेल, त्याची मदत करेल तर त्याच अस्तित्व तिथेच संपलं म्हणून समजावं. काही जणांच भाग्य तेवढं चांगल असतं की कोणीतरी काही क्षणांसाठी थांबत त्यांच्यासाठी पण हे भाग्य सगळ्यांना नाही लाभत.

प्रेम, आपलेपणा, आनंद, शांती, सुख, मैत्री या सगळ्यांपेक्षा त्याला ती शर्यत महत्वाची असते. काही वेळा त्याच हृदय त्याला हे सगळं सोडून देण्यासाठी समजावत असत. पण त्याचे विचार त्याला अस कधीही करू देत नाहीत. इथे हृदयाचा आणि मेंदूचा संघर्ष कायम सुरू असतो.

मग परत त्याची स्वप्नांच्या विश्वात जाण्याची वेळ येते. कुणाची लवकर येते कुणाची थोड्या वेळाने. परत एकदा सगळी दुनियादारी विसरून तो स्वप्नात हरवतो..

विचार करा कुठे या गोष्टीतला "तो" तुम्ही तर नाही ना?

आणि ती शर्यत तुमच्या आयुष्यातला एक दिवस.

विचार करा कदाचित तुम्हाला माझा विचार पटेल सुद्धा.

# आई

प्रिय आई

तू कशी आहेस? मला माहित आहे की या प्रश्नाला तसा काहीच अर्थ राहिलेला नाही. पण मनाला हे कळतच नाही. मागच्या २ वर्षात मी स्वतःबरोबरच लढत आहे. माझ मन आणि डोकं कायम संघर्षात आहे. जेवढा त्रास तुला झालाय तेवढाच मला पण झालाय.

याचा अर्थ असा नाही की माझी काही चूकच नाही. मी मान्य करतो की सगळी चूक माझीच आहे. पण मी जे पण करायचा प्रयत्न केलाय ते फक्त आणि फक्त तुझ्याचसाठी आई.

आठवतंय लहानपणी मी एक क्षण पण तुझ्यापासून लांब राहत नव्हतो. शाळेतून तर किती वेळा पळून यायचो. याच्यावरून तर विचार कर की मागचे हे २ वर्ष तुझ्या विना मी कसे काढले असतील. ते पण एका अनोळखी शहरात, अनोळखी माणसांबरोबर. भूतकाळ आपल्या हातात नसतो पण भाविष्यकाळासाठी आपण प्रयत्न तरी करू शकतो ना. मी तेच केलंय आणि तेच करतोय. ज्या दिवशी कळलं की तुला टिबी झालाय त्या दिवशी ठरवलं की काहीही होऊ दे तुला वाचवायच. आणि

त्यासाठी तुझ्यापासून लांब राहणं गरजेचं होतं. कारण जास्त पैसे कमवण्यासाठी किमान मुंबईला तर जावंच लागणार होतं. कारण आपल्या जगापलीकडे पण विश्व आहे हे आपल्याला माहीतच नसत. माणसाने किमान ध्येय तरी मोठं ठेवावं. ते पूर्ण करायचा प्रयत्न तरी करावा. आयुष्यात कधी १० हजार पण बघितले नव्हते आणि इथे तुझ्या औषधांसाठी किमान २ लाख लागणार होते.

माझं तुझ्यावर जेवढं प्रेम आहे त्यापेक्षा तुझं माझ्यावर जास्ती आहे हे माहीत आहे म्हणूनच मी त्या रात्री कुणालाही न सांगता घर सोडलं. कारण त्याशिवाय मी तुला, दादाला सोडून जाऊच शकत नव्हतो. मी गेलेल्याचा तुला नक्की त्रास झाला असणार पण माझ्याकडे दुसरा पर्याय नव्हता.

मी खूप विचार करून हा निर्णय घेतलेला. तिथून मी मुंबईला आलो सगळं नवीन होत माझ्यासाठी. रस्त्यावर झोपलो, मिळेल ते खाल्लं पण आपलं ध्येय विसरलो नाही. एक प्रश्न तुला नक्की पडला असणार की या २ वर्षात कधीच मी तुला भेटायला का आलो नाही? एक पत्र पण पाठवलं नाही, कारण त्यामुळेच मी इथे राहू शकलो. एकदा जरी पत्रात तू मला परत ये म्हणली असतीस तर मी स्वतःला थांबवू शकलो नसतो. आपल्या प्रेमानेच आपलं प्रेम संपवलं असत. तुझी रोज आठवण यायची पण दादा होता तुझ्या जवळ आणि मी तुझ्या मनात. भरपूर कष्ट केले या २ वर्षात. पैसे पण साठवले. पण शेवटी एक दहावी नापास मुलगा शिक्षणाच्या जोरावर किती कमवणार. वडा पावच्या गाड्यावर काम करण्यापासून पेपर टाकण्यापर्यंत सगळं केलं. रात्री झोपताना पण हेच डोक्यात असायचं की उद्या

असं काय करता येईल की आपण जास्ती पैसे कमवू? डॉक्टरांनी तुझ्याकडे २ वर्ष आहेत म्हणून सांगितलेलं आणि हीच गोष्ट मला आतून संपवत चाललेली. सगळया गोष्टींचा कंटाळून शेवटी मी असं काहीतरी ठरवलं जे तुला कधीही आवडणार नाही.

खूप विचार करून बरोबर चूक या गोष्टी बाजूला ठेऊन मी चोरी करायची ठरवली. माझ्याकडे काहीही पर्याय उरला नव्हता.

एका माहितीच्या माणसाला दगा दिला. घरातली सगळी माणसं गावाला गेली आहेत हे माहिती असल्यामुळं परवा रात्री मी त्या घरात घुसलो. पैसे हुडकून काढले आणि एकदम ओरडण्याचा आवाज झाला. मी घाबरून मागे पाहिलं तर त्यांची मुलगी घरीच होती आणि तिने मला चोरी करताना बघितलेलं. काय करावं मला काहीही कळत नव्हतं. आता तर माघार घ्यायला पण जागा नव्हती. कशाचा ही विचार न करता ती जोर जोरात ओरडायला लागली. १६ वर्षांची मुलगी. तिला सगळं कळलेलं.

एका क्षणासाठी सगळं थांबलं आणि दुसऱ्याच क्षणी माझ्या रक्षणासाठी आणलेला चाकू मी सरळ तिच्या पोटात घातला. मी काय केलं हे माझं मलाच कळायला थोडा वेळ लागला. कदाचित तिच्या जगण्यात मला तुझा मृत्यू दिसलेला.

काल सकाळी मी पैसे गावाकडे पाठवून दिले आहेत. पोलिस माझ्या शोधात लागले असणार यात काहीच शंका नाही.

कारण तिथून फक्त मी गायब झालोय. एकवेळ पोलिसांपासून पळेन पण स्वतःपासून नाही पळू शकणार. मी परत गावाला येणार नाही.

मी चूक केली आहे आणि त्याची शिक्षा मला मिळायलाच हवी. पण मला आता कसलंही दुःख, राग, निराशा काहीही नाही. मी सध्या जगातला सगळयात श्रीमंत आणि खुश माणूस आहे. मी माझ्या आईला वाचवलंय. आई काळजी घे.

हे आपलं शेवटचं पत्र.

तुझाच,

श्रेयस...

# काळकोठडी

तो अडकलाय, नाही त्याने स्वताला अडकवून घेतलय.

खूप खूप अंधारात, काळोखात, दुःखात आणि सगळयात महत्त्वाचं एकांतात.

हृदयाच ऐकण्यात तो एव्हडा मग्न झाला की डोकं काय म्हणतय याचाकडे त्याच लक्षच गेल नाही.

कदाचित ही सगळी चूक परिस्तिथीची आहे.

सगळं माहित असून सुदधा तो असं दाखवतोय कि मी ह्यातला नाहीच..

सगळ्यात वाईट म्हणजे तो स्वतालाच फसवतोय, पण का? कश्यासाठी?

एक गोष्ट मात्र खरी कि तो खूप बद्दलाय.

खूप खूप बद्दलाय.

आज काल त्याच्या चेहऱ्यावर एक वेगळाच दुःखाचा रंग असतो.

आता तुम्ही म्हणाल कि या कोठडीतून तो कसा सुटणार? ?

कधी सुटणार तरी आहे का? ?

खर सांगू, ते मला पण माहित नाही.

तो एक निव्वळ अपघात होता.

त्याच्या गाडीचा वेग पण जास्त नव्हता.

मागुुन येणाऱ्या गाडीची धडक बसली आणि त्याचा प्राण म्हणजेच त्याची सुमी त्याला कायमची सोडून गेली.

तो गाडीवाला सापडला. त्याच्यावर केस झाली. तो सध्या जेल मध्ये आहे.

पण शिक्षा मात्र माझा मित्र भोगतोय.

" तिच्या शिवाय मी कोणीही नाही रे "असं तो कायम म्हणायचा. आणि दुर्दैवाने त्याने ते सिद्ध करून दाखवल.

तो जिवंत आहे. पण जगणं काय असत हेच विसरलाय.

नोकरी करतो, पैसे कमवतो पण घरच्यांसाठी.

स्वतःसाठी काही नाही.

रोज संध्याकाळी त्या ठिकाणी जाऊन बसतो जिथे सुमी त्याला सोडून गेली.

आज काल जास्त नाही भेटत तो मला. आणि मी पण त्याला सारखं भेटायचा प्रयत्न नाही करत. तो मी आणि सुमी पहिल्यापासून एकमेकांना ओळखायचो. त्या दोघांची मैत्री, प्रेम सगळं माझ्या डोळयासमोरच तर झालं. त्यांच्या लग्नात सगळयात खुश कोण असेल तर तो मी होतो. मला भेटला की त्याला सगळं आठवतं. ते दिवस त्या आठवणी आणि त्या आठवणीतली सुमी. दुर्दैवाने माझ्या मित्राला आता माझाच त्रास होतोय.

काल पर्वा दिसलेला.

त्याच्या डोळयात बघून एक गोष्ट जाणवली.

त्या मनाच्या, परिस्तिथीच्या काळकोठडीतून बाहेर यायच्या कुलुपाची चावी त्याचाच हातात आहे.

पण तो त्या अंधारात सुमीला शोधण्याचा

त्या अंधारा बरोबर प्रेम करायच्या प्रयत्न करतोय..

# पाऊस

आज सुद्धा पाऊस कोसळतोय.

हा 'सुद्धा ' शब्द काही वेगळाच आहे.

भूतकाळाच्या कुठल्या आठवणीशी कधी कुठल्या माध्यमातून एकरूप करेल.... काही सांगता येत नाही.

अंग पूर्णपणे भिजलय.... या पावसातून सुटका नाही.... अगदी मनाचीसुदधा.....

आणि सुटका करायची तरी आहे कुणाला? ?

आठवणींमध्ये एक वेगळीच नशा असते... आणि नशा चांगली किंवा वाईट नसते.. नशा नशा असते..

ती मला पहिल्यांदा अश्याच पावसात याच ठिकाणी भेटली चिंब भिजलेली.

तिचे ते भिजलेले केस.

तोंडावर पावसात स्वतःला आणि हातातली पर्स सांभाळताना आलेले ते भाव. सगळं कसं जीवघेणं होत.

मी पावसापेक्षा त्यातच जास्त भिजलेलो.

क्षणासाठी सगळं थांबलेलं. तिचा तो सुंदर चेहरा आणि माझी त्याचावरची नजर. यापलीकडे जगात काही आस्तित्वात आहे यावर माझा विश्वासच बसत नव्हता.

मी खरं तर खूप कंटाळलेलो म्हणून तिथे होतो.

सगळ संपलेलं माझ्यासाठी.

पण मला तिथे ती मिळाली.

मला तिच्याबरोबर बोलावंसं वाटलं मनापासून.

ती कोण होती माहित नव्हतं.

आम्ही कधी आधी भेटलो हि नव्हतो. पण काही गोष्टी आयुष्यात पहिल्यांदाच होतात ना.

ही पण त्यातलीच एक.

डोकं आणि मनाचे पहिल्यांदाच एकमत झाले.

" जा तीच्याबरोबर बोल... ती कोण आहे विचार? "

मी स्वतःलाच सांगत होतो.

मी.. मी तुमची काही मदत करू का? ?

माझ्या त्या शब्दांबरोबरच तिने माझ्याकडे बघितलं. त्यातून एकच गोष्ट झाली की मी पुढे काहीच बोलू शकलो नाही.

ती हसली...

ते अनुभवन्यात पण वेगळाच आनंद होता.

आज दहा वर्षांनंतर मी एक सफल व्यक्ती आहे.

त्या हसण्याने मला एक वेगळीच आशा दिली.

आनंद दिला.

वेळ बदलली. काळ पुढे गेला.

आज ही पाऊस पडतोय. पण आज ती तशी एक अनोळखी व्यक्ती म्हणून पावसात भिजताना पर्स सांभाळताना दिसणार नाही.

कारण ती माझ्याबरोबर आहे.

माझा हात धरून. माझ्या डोळ्यात बघत तशीच हसत.

आज ती माझी बायको आहे.

# कबुली

मला चांगल आठवत सगळं. पण तुला आठवत का ग काही? "काही" म्हणलो कारण तुला सगळं आठवत नसणार याची मला खात्री आहे. कारण ते विश्व खरंतर तुझं होत आणि मी त्याचा एक छोटासा भाग असण्यापलीकडे काहीही नव्हतो. तुझ्याबरोबर आणि तुझ्या आसपास घालवलेले कितीतरी क्षण आठवणीच्या फ्रेममध्ये सजवून ठेवलेत मी. पण ती फ्रेम तुला नाही दाखवू शकलो मी कधी. साध्या सोप्प्या भाषेत बोलायचं तर तू माझ्यासाठी काय आहेस हे मी कधी तुला काय, स्वतःला पण नाही समजावू शकलो. फिरवून बोलायची सवय लागली आहे लेखक आहे ना मी. कदाचित तुला हे ही माहित नसेल, कस असणार? ना तू स्वतःहून कधी बोलणार ना मला बोलायला जमणार पण तुला आज खर सांगतो अगदी खरं. मनात साठवून ठेवलेलं एक गोड सत्य. मला आवडलेली तू पहिली मुलगी. बहुदा माझं पहिलं प्रेम.

पण आता हे विचारू नको कि पहिली आणि शेवटची का?

याचं उत्तर नाही माझ्याकडे.

# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी सिनेमा हा एकेकाळी भारतात हिंदी सिनेमाच्या तोडीस तोड किंवा काकणभर वरचढच होता. मध्यंतरी मराठी सिनेमाला उतरती कळा लागली. प्रेक्षक येईना. म्हणून थिएटर मिळेना. थिएटरच मिळत नाही म्हणून चांगले मराठी सिनेमा बनेनात. आणि चांगले सिनेमा नाहीत म्हणून प्रेक्षक मिळेनात. असे एक दुष्टचक्र सुरू झाले. मग आला झी मराठी सिनेमा. आणि त्याच्याच जोडीने छोट्या आकाराची मल्टीप्लेक्स आणि डिजिटल प्रक्षेपण. त्यामुळे पुन्हा एकदा मराठी सिनेमा जोमाने बहरू लागला.

काहीशी अशीच परिस्थिती मराठी साहित्याचीही होत आहे. एकेकाळी टॉपला असलेले मराठी साहित्य मधल्या काळात टिव्ही आणि सिनेमाच्या युगात मागे पडले. पण आता मोबाईल आणि इंटरनेट यांच्यामुळे मराठी वाचकवर्ग फ़ार मोठ्या प्रमाणावर वाढतो आहे. आणि त्याच जोमाने त्यांच्यासाठी लिहिणारा दर्जेदार लेखक वर्गही निर्माण होऊ लागला आहे. मराठी साहित्याच्या भविष्याबद्दल आम्ही अत्यंत आशावादी आहोत.

आपली साथ मात्र पाहिजे. आपल्या ओळखीच्या जास्तीत जास्त लोकांना ई साहित्य बद्दल सांगा. त्यांचे ई मेल पत्ते व whatsapp नंबर कळवा. त्यांना ई साहित्यचं मोबाईल app download करायला सुचवा. आग्रह करा. ई साहित्यचे

मार्केटिंग करा. एकदम फ्रंट फुटवर येऊन खेळू. जबरदस्त मार्केटिंग करू. लाखांचे कोटी करू आणि मराठी साहित्य पुन्हा नंबर वन ला आणू.

ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahitya. com

esahity@gmail. com

आता ई साहित्य चे APP उपलब्ध आहे. ई साहित्यचं App आपण खालील लिंकवरून आपल्या मोबाईलवर डाऊनलोड करा आणि भरमसाट पुस्तकं फ्री वाचा.

https://play. google. com/store/apps/details? id=com. esahity. www. esahitybooks

ई साहित्य प्रतिष्ठानची ई बुक्स Whatsapp broadcast service सुरू झाली आहे. पूर्णपणे फुक्कट पुस्तकं आता आपल्या मोबाईलवर थेट. कृपया नांव नोंदणीसाठी 7710980841 हा नंबर आपल्या मोबाईलवर सेव्ह करा आणि नंतर या नंबरवर वॉट्सऍप करून आपले नांव व शहराचे नांव कळवा. आपल्याला नियमितपणे एक नवीन मराठी ई पुस्तक Whats app द्वारे पाठवले जाईल. आपण ते पुस्तक आपल्या मित्रांना Whatsapp करा आणि भाव खा.

आपल्या ओळखीच्या किमान दहा लोकांचे मेल आय डी आम्हाला कळवा. त्यांना आम्ही विनामूल्य पुस्तके पाठवू. व आपल्याला VIP सभासद बनवले जाईल.